# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०१/०८/२०१९

## <u>मा. महासभा</u>

### मा. महासभा सुचना क्र. ०२

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ०९/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका

### मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा दि. ०९/०८/२०१९ सभा सुचना क्र. ०२

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे -** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| ३३ | दि. ०२/०३/२०१९ व दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ३४ | मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहक यांचे वेतनात वाढ करणेबाबत. |
| ३५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. २३३ या शासकीय जागेत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधणे कामाबाबत. |
| ३६ | शहर विकास व नियोजन अधिकारी हे पद आकृतीबंधात नव्याने प्रस्तावित करुन नेमणुकीची पध्दत व टक्केवारी तसेच शैक्षणिक अर्हता विहित करणेबाबत. |
| ३७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान या योजने अंतर्गत समितीने केलेल्या कामांसाठी महानगपालिकेच्या ५०% हिश्श्याची रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत. |
| ३८ | महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड एज्युकेशन रिसर्च, पूणे (माईर) या संस्थेच्या मालकीच्या मौजे काशि, जिल्हा ठाणे येथील मिळकत गट नं. २५/१५, ३०/१२अ, ३०/१३, ३०/१८, ६८/१, ७०/१०, ७०/१२, ७१/१, ७२/५, ७२/८, ७२/१० या जमिनिच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत झोन बदलून मिळणेबाबत. |
| ३९ | डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकिय अधिकारी (निलंबित) भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबत. |
| ४० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका कायम स्वरुपी हस्तांतरीत करणेबाबत. |
| ४१ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत. |
| ४२ | मिरा भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून अधिकचे २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मिळणेबाबत. |
| ४३ | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका, सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था DPR मंजूरीकरीता. |
| ४४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कापुरबावडी बुस्टर पंप हाऊस येथील पंपींग मशिनरीचे वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता नुतनीकरण करुन अद्यावत करणे. |
| ४५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवन रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| ४६ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शरीरसौष्ठवपटटू श्री. नितीन म्हात्रे यांस क्रिडापटटुंसाठी राखीव कोट्यातून नोकरीसाठी शासनाकडे शिफारस करणेबाबत. |
| ४७ | मौजे डोंगरी सर्व्हे क्र. ४९क हिस्सा क्र.१/१७८(ड), १७८(ई), १०५(२) व २९७ या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे. |

| | |
|---|---|
| ४८ | मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. ७२(२), ७३(१)(२)(३)(४), ७४(१)(२), ७९(१)(३)(४), ७५(१) या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे. |
| ४९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र. ३२८ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन सेंट विलफेअर एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत. |
| ५० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र. २५२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत. |
| ५१ | चेना येथील ठाणेकडे जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद रस्त्यापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. ९८ पर्यंतचा १८.०० मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत. |
| ५२ | पर्यावरण अहवाल माहितीसाठी. |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे - |

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०१९

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे, 401101

## मा. महासभा दि. 08/08/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्रं 34 :- मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहक यांचे वेतनात वाढ करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेण्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत 06 काळजीवाहक नेमण्यात आले होते ते मार्च 2015 पर्यंत कार्यरत होते. परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि.08/04/2015 रोजीच्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये अशा स्पष्ट् सुचना देण्यात आल्या की,कार्यरत काळजीवाहक यांच्या मानधनाची रक्कम् शासनाकडुन सन 2015-16 साठी मंजुर करण्यात आली नाही.

त्याअनुषंगाने शिक्षण विभागामार्फत त्यांच्या कार्यालयात दि.13/04/2015 रोजी बैठक घेण्यात आली व काळजीवाहक यांना कार्यमुक्त् करण्याच्या तोंडी सुचना देण्यात आल्या होत्या तथापि मा. आयुक्त् सो. यांचेकडुन सदर कार्यरत खालील काळजीवाहकांना मुदतवाढ देणे व त्याचे मानधन हे समाजविकास विभाग "अंध व अपंग कल्याण योजना" अंतर्गत अदा करण्याचे तोंडी निर्देश प्राप्त् झाले होते. त्यानुसार खालील 06 काळजीवाहकांना मा. महासभा दि.04/12/2015 प्रकरण क्रं.116 ठराव क्रं.87 नुसार रु.4000/- मानधन देण्यात आले होते.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक |
| 2 | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक |
| 3 | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक |
| 4 | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक |
| 5 | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक |
| 6 | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक |

काळजीवाहकांना मानधन अंध व अपंग कल्याण योजनेच्या "अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy/शिक्षणासाठी आर्थिक मदत" या लेखाशिर्षातुन करण्यात यावी सासाठी मा. महासभा दि.12/08/2016 प्रकरण 40, ठराव क्रं.39 अन्वये काळजीवाहकांचे वेतन रु.6000/- करण्यात आले.

4.15

संदर्भिय मा. महापौर सो. यांच्या पत्रान्वये सदर काळजीवाहकांचे मानधन वाढविण्याबाबत कळविलेले आहे. "मतिमंद मुलांसाठी शाळा/सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहकांचे मानधन" या लेखाशिर्षा अंतर्गत सन 2019-20 या अर्थसंकल्पात रु.20 लाख (रु. वीस लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने काळजीवाहक यांना 1 एप्रिल पासुन पुढे मुदतवाढ देणे व सदर लेखाशिर्षातुन एप्रिल 2019 पासुन काळजीवाहकांचे मानधन रु.8000/- प्रती महिना अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर ठेवणेस शिफारस आहे.

उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ११/०६/२०१९ वेळ ०४:१५
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ......२६.... वर्ष :- ...२०१९-२०

लिपीक ११/०६/२०१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि.०९/०८ /2019**

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक (३५) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र.233 या शासकीय जागेत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधणे कामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र.233 या शासकीय जागेवर राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधण्याचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. मौजे घोडबंदर सर्व्हे क्र.233 ही शासकीय जागा असून रहीवास क्षेत्रात समाविष्ट आहे. सदर सर्व्हे क्रमांका मधील 3800.00 चौ. मीटर जागा ही महसूल विभागाची असून सामाजिक व न्याय विभागामार्फत सदर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2014/प्रक्र.61/बांधकामे दि.16 डीसेंबर 2015 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामाबाबत मा. मंत्री, सामाजिक न्याय यांच्या दालनात दि.28/11/2018 रोजी बैठक झाली सदर बैठकीतील निर्देशानूसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्रस्तावित जागेवर इमारत बांधण्याचे नकाशे, अंदाजपत्रक तयार करून शासन निर्णयानूसार समाजकल्याण विभाग ठाणे यांना प्रस्ताव सादर करावयाचा आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत सदर कामासाठी 90% निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून 10% निधी महानगरपालिकेस खर्च करावयाचा आहे. सदर इमारत पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल, दुरूस्ती, परिरक्षण, दैनंदिन खर्च, स्थानिक कर, वीज बील, पाणी बिल ही जबाबदारी देखील महानगरपालिकेची राहणार आहे. सदर प्रकल्पाची जागा सामाजिक न्याय विभागाची राहणार आहे.

शासन निर्णय दि.16 डीसेंबर 2015 नूसार सदर इमारत स्वयंसेवी संस्थामार्फत प्रस्ताव सादर करून बांधावयाची आहे. तथापी सदर काम महानगरपालिका हद्दीत असल्याने व महानगरपालिका स्थानिक स्वायत्त संस्था असल्याने या प्रकल्पासाठी महानगरपालिका प्रस्ताव सादर करून प्रस्ताव मान्य झाल्यानंतर कामाची अंमल बजावणी देखील महानगरपालिका करणार आहे.

सदर प्रकल्पाचे प्रथम टप्प्यात तळ अधिक एक मजल्यासाठी 1905 चौ. मीटर क्षेत्रफळाकरीता रु.13,85,23,901/- रकमेचे अंदाजपत्रक मे.5, इलेमेन्ट डीझाईन सेल या सल्लागारामार्फत सादर केलेले

आहे. सदर अंदाजपत्रकासह प्रस्ताव मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. तरी सदर प्रकल्पासाठी 10% निधी महानगरपालिकेमार्फत करण्यास मान्यता देणेस व सन 2019-20 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २८/१२/२०१८ वेळ ११.०
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. ८3 वर्ष :- २०१८/१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-12

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.महासभा दि.०९/०८/2019**

**//गोषवारा//**

प्रकरण क्र. ३६ :- शहर विकास व नियोजन अधिकारी हे पद आकृतीबंधात नव्याने प्रस्तावीत करून नेमणुकीची पध्दत व टक्केवारी तसेच शैक्षणिक अर्हता विहित करणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महासभा दि.30/01/2016 ठराव क्र.103 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका नविन आकृतीबंधास मंजुरी देण्यात आलेली आहे. मा. महासभेने मंजुरी दिलेल्या आकृतीबंधास शासन मान्यता मिळणेकरीता दि.05/03/2016 रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.

सदर शासनास सादर केलेल्या आकृतीबंधावर विचारविनिमन करणेकरीता मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचे दालनात दि.29/11/2016 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.प्रधान सचिव यांनी सुधारीत आकृतीबंध सादर करणेचे कळविले होते. त्याअनुषंगाने बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार आकृतीबंध तयार करुन सुधारीत आकृतीबंध दि.28/04/2017 तसेच दि.06/06/2017 रोजीच्या पत्रान्वये शासनाला मंजुरी मिळण्याकरीता सादर केलेले आहे.

परंतु मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजुर होवून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजुर होऊन दि.15/10/2000 पासुन अंमलात आलेली आहे. मिरा भाईंदर शहराचे एकुण क्षेत्र 79.40 चौ.कि.मी असुन मिरा भाईंदर शहर मुंबई महानगरपालिकेच्या व ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीलगत असल्यामुळे शहराचा विकास झपाटयाने होत असून लोकसंख्येमध्येही वाढ होत आहे.

शहरातील वाढ होणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता शहरामधील नागरिकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असून शहराच्या सुधारीत विकास योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर पदापैकी सहाय्यक संचालक व सहाय्यक नगरचनाकार हि पदे शासनामार्फत प्रतिनियुक्ती ते भरणे आवश्यक असल्यामुळे शहरासाठीच्या मंजुर विकास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी ठाणे महानगरपालिका प्रमाणे शहराची माहिती असणारा व नगररचना विभागासह शासन निर्णयाचे ज्ञान असणारा अधिकारी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरूपी असणे आवश्यक आहे.

त्यामुळे मिरा भाईदर महानगरपालिका नगररचना विभागासाठी शहर विकास व नियोजन अधिकारी हे पद आवश्यक आहे. तरी शासनास या पूर्वी सादर केलेल्या आकृतीबंधामध्ये शहर विकास व नियोजन अधिकारी नव्याने प्रस्तावित करण्यात यावे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नगररचना विभागसाठी वर्ग-01, वर्ग-02 ची पदे शासनामार्फत प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. त्यामुळे नगररचना विभागातील कनिष्ठ अभियंता यांना 10 वर्षापेक्षा जास्त कालावधी कार्यरत असून सुध्दा पदोन्नतीची संधी प्राप्त झालेली नाही. त्यामुळे शहर विकास व नियोजन अधिकारी या पदासाठी नेमणुकीची पध्दत व टक्केवारी तसेच शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे विहित करण्यात यावी.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|---|
| श्रेणी- 01 शहर विकास सेवा | शहर विकास व नियोजन अधिकारी | पदोन्नती 100% | -- | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (बी.ई.सिव्हिल)<br>ब) महानगरपालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे नगररचना विभागात कार्यरत कनिष्ठ अभियंता संवर्गात 05 वर्षाच्या अनुभवासह सहाय्यक नगररचनाकार या पदाचा 02 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>किंवा<br>अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदविका (डी.सी.ई.)<br>ब) महानगरपालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे नगररचना विभागात कार्यरत कनिष्ठ अभियंता संवर्गात 10 वर्षाच्या अनुभवासह सहाय्यक नगररचनाकार या पदाचा 02 वर्षाचा अनुभव आवश्यक. |

तरी वरीलप्रमाणे शहर विकास व नियोजन अधिकारी हे पद नगररचना विभागासाठी यापूर्वी सादर केलेल्या आकृतीबंधात नव्याने प्रस्तावीत करण्यात यावे. तसेच विहित केलेली नेमणुकीची पध्दत व टक्केवारी तसेच शैक्षणिक अर्हतेस मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. महासभा दि. ०९/०६ /2016

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ३८ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत समितीने केलेल्या कामांसाठी महानगरपालिकेच्या 50% हिश्श्याची रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समितीने "महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान" या योजनेअंतर्गत दि.12/02/2016 रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर न्यु गोल्डन नेस्ट येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| २) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर इंद्रलोक फेस-२ गेट जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बालाजी हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ४) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील नक्षत्र टॉवर जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ५) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील तुंगा हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ६) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील चैतन्य हॉस्पिटल (टाटा डोकोमो) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ७) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ८) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बेवर्ली पार्क (मॅकडॉनल्ड नाका) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ९) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील एस.के.स्टोन सिग्नल येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १०) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सुंदर नगर येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सिल्वर पार्क येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १२) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील हटकेश (मारुती सुझुकी शोरुम) येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील आशिष पटेल बंगल्याशेजारी येथे बस थांबा | रु.५,००,०००/- |

१०४५

| | | |
|---|---|---|
| १५) | भाईंदर (पूर्व) गौरव गार्डन, शुभम बार समोर बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १६) | हटकेश येथील १५ नं. बस स्टॉप येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १७) | हटकेश येथील २२ नं. शेवटचा बस स्टॉप (शांतीनगरी) बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| | एकूण | रु.८५,००,०००/- |

वरील कामांचा निधी उपलब्ध करुन देणेसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर कामांसाठी 50% निधी हा महानगरपालिकेस खर्च करावयाचा आहे. सदर 50% हिश्श्याची रक्कम महानगरपालिका करणार असल्याबाबत ठराव घेऊन अनुदान उपलब्धतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेत ठेवला असता मा. महासभा दि. 05/09/2018 ठराव क्र. 62 अन्वये तरतूदीबाबत सविस्तर माहीतीसह प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय घेण्यास सदयास्थितीत सन 2019-20 वर्षाचा अर्थसंकल्पात मंजुर झालेला असुन सदर अर्थसंकल्पात मुलभूत सेवा मनपा हिस्सा या लेखाशिर्षाखाली रु. 5.00 कोटी तरतूद असून प्रस्तावित कामासाठी 50% रक्कम रु. 42.50 काम सदर लेखाशिर्षातुन करता येईल. तरी प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2018-19/DK/MG-3

गोषवारा प्राप्त दि. २५/०६/२०१९ वेळ 10.25
प्रा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 29 वर्ष :- 2019-20

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०९ /0८/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (३८) - <u>महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड एज्युकेशन रिसर्च, पूणे (माईर) या संस्थेच्या मालकीच्या मौजे काशी, जिल्हा ठाणे येथील मिळकत गट नं.25/15; 30/12अ; 30/13; 30/18; 68/1; 70/10; 70/12; 71/1; 72/5; 72/8; 72/10 या जमिनीच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 अंतर्गत झोन बदलून मिळणेबाबत.</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे काशी येथील स.क्र. 25/15, 30/12अ,13,18, 68, 70/10, 70/12, 71/1, 72/5,8,10 या जमिनी महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड एज्युकेशन रिसर्च, पुणे (माईर) या संस्थेच्या मालकीच्या असलेबाबत व या संस्थेस या जागेमध्ये शहरातील जनतेला चांगल्या दर्जाच्या शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण मिळणेसाठी सदर जमिनी **"नाविकास"** क्षेत्रातून **"सार्वजनिक व निमसार्वजनिक"** क्षेत्राखालील वापरामध्ये वर्ग होणेस संस्थेने दि.15/05/2019 रोजी शासनाकडे विनंती केलेली असून त्याप्रमाणे सदर प्रकरणी उचित कार्यवाहीसाठी शासनाने संदर्भिय पत्रान्वये संस्थेचा अर्ज महानगरपालिकेकडे वर्ग केलेला आहे.

सदरच्या विषयांकित जागेपैकी मौजे काशी, स.क्र. 25/15, 30/12,13,18, 70/10,12, 71/1, 72/5,10 या जागेमध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे "जिम्नॅशियम" च्या वापरासाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/1680/2019-20, दि.28/06/2019 अन्वये मे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअर्स ॲन्ड एज्युकेशन रिसर्च यांना सुधारीत नकाशे मंजूरीसह सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदरची विषयांकित जागा मंजूर विकास योजनेप्रमाणे "नाविकास" क्षेत्रात सामाविष्ट असून सी.आर.झेड. च्या वर्गीकरणाच्या नकाशाप्रमाणे सी.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

अर्जदार मे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअर्स ॲन्ड एज्युकेशन रिसर्च, पुणे यांनी सदर जागेच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 20 अन्वये वापरात बदल करुन "सार्वजनिक व निमसार्वजनिक" प्रमाणे वापर बदलून मिळणेबाबत शासनास विनंती केलेली आहे.

तथापि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 20 हे प्रादेशिक विकास योजनेमधील वापर बदलाबाबतचे असल्यामुळे व मिरा भाईंदर शहरासाठी स्वतंत्र विकास योजना मंजूर झालेली असल्यामुळे अर्जदाराच्या मागणीप्रमाणे **"नाविकास"** क्षेत्रा ऐवजी शैक्षणिक प्रयोजनासाठी **"सार्वजनिक व निमसार्वजनिक"** या वापरासाठी करावयाच्या फेरबदलाचा प्रस्ताव सादर करावयाचा झाल्यास तो महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार फेरबदल प्रस्तावित करावा लागेल.

सबब सदर प्रकरणी निर्णयासाठी अहवाल मा. महासभेस सादर.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
6/7/19.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०९/०८/2019

### ||गोषवारा||

प्रकरण क्र.३९ :- डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी (निलंबीत), भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबत.

डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे कार्यरत असून दि.16/01/2018 पासून ते आजपर्यंत विनापरवानगी गैरहजर आहेत. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांना विनापरवानगी गैरहजर प्रकरणात वेळोवेळी नोटीस देण्यात आलेल्या असून जा.क्र.मनपा/आस्था/1659/2018-19, दि.22/01/2019 रोजी अन्वये गैरहजरबाबत निलंबीत का करण्यात येऊ नये याचा खुलासा सादर करणेबाबत अंतिम नोटीस देण्यात आलेली होती. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांनी दि.26/02/2019 रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात आलेला आहे.

यावरुन डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांनी विनापरवानगी गैरहजर राहून त्यांच्या कामात कर्तव्यपरायणता न ठेवल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 3(1)(दोन) चा भंग केल्याचे दिसून आलेले आहे.

सबब डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांना जा.क्र.मनपा/आस्था/निलंबन/231/2019-20, दि.14/05/2019 रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56 अन्वये व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 4 नुसार चौकशीच्या अधीन राहून महानगरपालिका सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(1)(ब) नुसार निलंबन कायम करणेचे अधिकार मा. महासभेचे असल्याने डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(दिपक पुजारी)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Jyoti\Jagananath Pimpale\Dr. Akash Rangari\गोषवारा.doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०९/०८/2019

## मिळकत विभाग

## // गोषवारा

**प्रकरण क्रमांक (४०) :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य आवास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका कायम स्वरूपी हस्तातंरीत करणेबाबत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य आवास योजनेंतर्गत राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्यांची सेवा 25 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, अशा सफाई कामगारांना सेवा निवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधना नंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिकेकडून मालकी हक्काने अहस्तांतणीय स्वरूपात 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत वाटप करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : सकानि-2007/प्र.क्र.176/2007/नवि-06 दि.22 आक्टोबर 2008 अन्वये धोरण आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत 68 सफाई कामगारांना सुविधा क्षेत्र भूखंडावर बांधलेल्या सदनिका 2015 मध्ये वाटप करण्यात आल्या आहेत. सदर सदनिका ह्या मालकी तत्वावर मोफत दयावयाच्या आहेत. सह. जिल्हा निबंधक वर्ग - 1 (उश्रे) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे शहर यांनी कळविल्यानुसार सदर सदनिकांचे शुल्क रू. 100/- ठरावून व सदर बाजारभाव ग्राह्य धरून महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे अनुसुची - 1 चे अनु - 25 (b) नुसार 5% दराने अधिक स्थानिक अधिकार कर 1% दराने मिळून किमान मुद्रांक शुल्क रू. 100/- आकारावयाचे आहे. सदर सदनिकाचे बाजारभाव रू. 100/- ठरवून सदर करारनामा करून सदनिका हस्तांतरीत करण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर) 18/7/19

**आयुक्त**

मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-M /2019-20/S.M/S-Go -3

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

## मा. महासभा दि. ०९ /०८ /2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (४५) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता भाडे दराने न देता फक्त दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेच्या अनुषंगाने सदर जागा मिळणेबाबत खालील संस्थेचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | मालमत्तेचे नाव | अर्जदाराचे नाव / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1 | मनपा इमारती मधील व्यायाम शाळा मोर्वा, उत्तन रोड, भाईंदर (प.) | मे. आधार सहकारी पतपेढी मर्या. मोर्वा, भाईंदर (प.) |
| 2 | उत्तन व्यायाम शाळा, उत्तन, भाईंदर (प.) | उत्तन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, उत्तन भाईंदर |

मोर्वा येथील बालवाडी व्यायामशाळा इमारत ज्या जागेवर आहे ती जागा राधाकृष्ण देवस्थान ट्रस्टी व श्री. काशिनाथ गोविंद पाटील यांच्या मालकीची असून श्री. राधाकृष्ण मंदिर, मोर्वा यांनी देखिल सदर जागा देखभाल संचलनासाठी देण्याची मागणी केलेली आहे. तरी सदर अर्जासह महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार मागणी करणाऱ्या संस्थामधुन तीन वर्ष मुदती करीता मालमत्ता करारानामा करून देण्यास मान्यता असावी.

५/७/१९.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-M /2019-20/S.M/M-Go -3

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०e / ०८ /२०१९.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( ४२ ) :- मिरा भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून अधिकचे २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर शहर हे मुंबई व ठाणे लगत असल्याने व्यवसाय व कामानिमीत्ताने मोठया प्रमाणात जनता वास्तव्यास येत आहे. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात म्हाडा व मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत गृहसंकुले बांधण्यात आलेली आहेत व प्रस्तावीत आहेत. नियमाप्रमाणे सदर संकुलांना मुलभूत सुविधा अंतर्गत पाणी पुरवठा देणे अपरिहार्य आहे.

मिरा-भाईदर शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ८.१४ लक्ष इतकी असून सध्याची सन २०१९ ची लोकसंख्या अंदाजे १२.०६ लक्ष असून पाण्याची मागणी २११द.ल.लि. प्रति दिन आहे. मिरा-भाईदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (५० + ७५ = २११ द.ल.ली.) असा एकूण २११ द.ल.ली. पाणी मंजूर आहे. त्यापैकी सद्यस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ९० द.ल.ली. व स्टेम प्राधिकरणाकडून ८६ द.ल.ली. असा १७६ द.ल.ली. पाणी पुरवठा होत आहे.

सद्यस्थितीत होणारा पाणी पुरवठा आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्यापेक्षा ३५ द.ल.लि. ने कमी होत आहे. सदरचे ३५ द.ल.ली. पाणी या हंगामात बारवी धरणात वाढ झालेल्या उंचीपर्यंत पाणी साठा झाल्यानंतर उपलब्ध होणार आहे. सदरचे पाणी मिरा भाईंदर शहरास उपलब्ध करुन देण्यासाठी दि. २५/०६/२०१९ रोजी मा. मंत्री वैद्यकिय शिक्षण व जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचे अध्यक्षतेखाली विधानभवन येथे झालेल्या बैठकी मध्ये मा. मंत्री महोदययांनी जलसंपदा विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषगांने जलसंपदा विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पत्राने कळविलेले आहे. सदरचे पाणी उपलब्ध झाल्यानंतर मिरा भाईंदर शहराची सद्याची जेमतेम पाण्याची गरज पूर्ण होणार आहे.

मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी सुर्या धरण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून २१८ द.ल.ली. पाणी आरक्षीत आहे. मात्र सदरचे पाणी शहरात उपलब्ध होण्यासाठी लक्षणीय कालावधी अपेक्षीत आहे. सबब किमान सन २०२१ पर्यंतची शहराची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी बारवी धरणातून अधिकचे २५ द.ल.ली. पाणी मंजूर झाल्यास सदरचे पाणी शहरापर्यंत आणण्यासाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधा सक्षम आहेत. त्यासाठी कोणत्याही प्रकारची जादाची कामे करणे अपेक्षीत नाही.

तरी शहराची सन २०२१ ची पाण्याची मागणी पुर्ण करण्यासाठी एम.आय.डी.सी. बारवी धरणातून मिरा भाईंदर शहरासाठी अधिकचे २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेत मंजूरीसाठी ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त<br>
मिरा-भाईंदर महानगरपालिका १८/७/१९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि. ०९/०८/2019

// गोषवारा //

**प्रकरण क्र. :- ८५ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमा अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका करिता 60,000 वृक्ष लागवडीचे उदिध्ठ देण्यात आलेले होते. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या किनारपट्टी लगत 58000 कांदळवण (Mangroves) झाडांची लागवड करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (महाराष्ट्र शासकीय उपक्रम) यांना कांदळवणाची लागवड करून करुन 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामाचे सविस्तर अंदाजपत्रक करून मिळणेबाबत दि.14/06/2019 रोजी पत्र देण्यात आले होते. त्यानुसार मा.विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग यांनी सदर कांदळवण लागवडीचे काम वनविकास महामंडळ यांच्या मार्फत करण्यात येणार आहे किवा कसे याबाबत दि. 26/06/2019 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांना दि.28/06/2019 रोजी कांदळवणाची लागवड आपल्या मार्फत करण्यात येणार असल्याबाबत कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार दि. 16/07/2019 रोजी विभागीय व्यवस्थापक वनप्रकल्प विभाग, ठाणे, यांनी कांदळवणाची लागवड करून 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामी रू.1,03,51,489.36 चे अंदाजपत्रक प्रती रोप रू.178.47 याप्रमाणे खालीलप्रमाणे दिलेले आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम रू. | दर प्रती रोप रू. |
|---|---|---|---|
| 1. | पुर्व पावसाळी व प्रथम वर्षे कामे | 84,04,503.83 | |
| 2. | व्दितीय वर्षे कामे | 19,46,985,53 | |
| | **एकुण रक्कम** | **1,03,51,489.36** | **178.47** |

तरी उपरोक्त् अंदाजपत्रकानुसार महाराष्ट्र शासन फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (महाराष्ट्र शासकीय उपक्रम) यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र शासनाच्या जागेमध्ये किनारपट्टी लगत कांदळवण (Mangroves) झाडांची लागवड करुन 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामी अंदाजे **रु.1,03,51,489.36** ( रुपये एक कोटी तीन लाख एकावन्न हजार चारशे एकोन्नवद छत्तीस पैसे मात्र) खर्च अपेक्षित आहे.

**सन 2019-20** या वर्षात वृक्ष प्राधिकरण विभाग **"वृक्षारोपण / सामाजिक वनीकरण / निसर्ग उदयान"** या लेखाशिर्षकाखाली रु. 150.00 लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात किनारपट्टीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लागवड करुन 2 वर्षे निगा व देखभाल मा.विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग,ठाणे यांच्याकडून करून घेणेकामी मा.महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

1/8/19

**आयुक्त**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०९ /०८ /2019

## // सुधारीत गोषवारा //

**प्रकरण क्र. (५७ )** :- चेना येथील ठाणेकडे जाणा-या 30.00 मी. रुंद रस्तयापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. 98 पर्यंतचा 18.00 मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये फेरबदल करणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसुचना टिपीएस-1296/847/सीआर-162/युडी-12 दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना क्र.टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12 दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासुन अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-1208/1346/प्रक्र.267/08/नवि-12 दि.21/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झालेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना येथील पाटीलपाडा व बेलकरीपाडा ही दोन आदिवांसी पाडे अस्तित्वात असून सदरील पाडयांस जाण्याकरीता पक्के रस्ते अजुनही उपलब्ध नाही. त्यामुळे तेथिल स्थानिक रहिवाश्यांना दैनंदिन कामकाजासाठी कच्चा रस्त्यावरुन चालत जावे लागते.

सद्यस्थितीत सदरील पाडयांकडे जाण्यासाठी स.क्र.147 मधील हॅरीटेज हॉटेलपासून स.क्र.119 पर्यंत नदीलगत 6.00 मी. रुंदीचा डांबरी रस्ता सार्वजनिक विभागामार्फत विकसीत करण्यात आलेला असूनसदरील रस्ता विकास योजनेत दर्शविलेला नाही. सदर रस्ता हा दोन्ही पाड्यांपर्यंत जात नसून अर्ध्यावरती संपुष्टात येत आहे. सबब हॉटेल हिल व्ह्यु पासून चेना नदीवरील जुन्या पुलापर्यंत 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता विकास योजनेत दर्शविलेला आहे. तथापि सदर भागातील पाटीलपाडा, बेलकरीपाडा व इतर रस्त्याकडे जाण्यासाठी खालीलप्रमाणे यासोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता प्रस्तावित करावयाचा आहे.

घोडबंदर कडून ठाणे कडे जाण्यासाठी 30.00 मी. रुंद रस्त्यापासून भाग नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे "अे" ते "बी" पर्यंतचा मंजूर विकास योजनेप्रमाणे 12.00 मी. रुंदीच्या प्रस्तावित केलेल्या रस्त्यास 18.00 मी. रुंदीचा प्रस्तावित करावयाचा आहे.

"बी" ते "एफ" पर्यंतचा रस्ता नव्याने 18.00 मी. रुंदीचा प्रस्तावित करावयाचा आहे

वरील प्रमाणे भाग नकाशामध्ये दर्शविल्यानुसार "अे" ते "बी" पर्यंत 12.00 मी. ऐवजी 18.00 मी. रुंदीचा व "बी" ते "एफ" पर्यंत 18.00 मी. रुंदीचा रस्ता नव्याने प्रस्तावित करणेसाठी मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
४/६/१९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. ०७/ ०८ /२०१९.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( ४३ )** :- आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)
२१८ द.ल.ली. सुर्या पाणी पुरवठा योजना DPR मंजूरीकरीता.

१) मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास २१८ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी सुर्या धरणापासून मिरा भाईंदर शहरापर्यंत एकूण ९८ कि.मी. लांबीची जलवाहिनी तसेच चेणे येथे वनखात्याच्या जागेत ४८ द.ल.ली. क्षमतेची मुख्य संतुलन टाकी बांधून चेणे येथील टाकीपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण २१८ द.ल.ली. पाणी पुरवठा करणार आहे.

२) चेणे येथील संतुलन टाकी पासून मिरा भाईंदर शहरात पाणी आणणे व शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे.

३) याकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. वॉटरनेट कंन्सलटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली होती.

४) त्यानुसार मे. वॉटरनेट कंन्सलटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सदर प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

अ) उंच पाणी साठवण टाक्या बांधणे,

ब) वितरण व्यवस्था, फिडरमेंन /ट्रमिशनमेन अंथरणे,

क) चेने येथील मुख्य संतुलन टाकीपासून घोडबंदर रस्त्याने एम.एम.आर.डी.ए. यांनी संपादित केलेल्या जमिनीतून व तेथून पुढे फाउंटन हॉटेल ते दहिसर चेक नाका पर्यंत १७०० मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी नॅशनल हॉयवेच्या डाव्याबाजूने रस्त्यातून अंथरणे. इत्यादी बाबींचा समावेश आहे.

५) मे. वॉटरनेट कंन्सलटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल दोन फेजमध्ये असून फेज-१ ची रक्कम रु. ४१८ कोटी व फेज-२ ची रक्कम रु. ७६ कोटी आहे. यापैकी प्रथमत: फेज-१ ची कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

६) सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी अमृत योजना या शिर्षकाखाली मनपा हिस्सा मध्ये रु.६०.०० कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

७) सदर सविस्तर प्रकल्प अहवालास आय.आय.टी. मुंबई / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियांतर्गत मंजूरीसाठी सादर करावयाचा आहे.

तरी सदर कामास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका 5/8/19

# मिरा-भाईदर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. ०९ / ०८ /२०१९.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( ४४ )** :- आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)
मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या कापुरबावडी बुस्टर पंप हाऊस येथील पंपींग मशिनरीचे वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता नुतनीकरण करुन अद्यावत करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस एम.आय.डी.सी कडून १२५ द.ल.ली. पाणी मंजूर आहे. त्यापैकी सद्यस्थित ९० द.ल.ली. पाणी उपलब्ध झालेले आहे. दि.२५/०६/२०१९ च्या विधानभवन मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये अजून २५ द.ल.ली. पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत एम.आय.डी.सी. स सुचना दिलेल्या आहेत.

एम.आय.डी.सी कडून प्राप्त होणारे पाणी प्रथम साकेत व कापुरबावडी येथून पंपिंग करुन मिरा-भाईंदर शहरास पाठविण्यात येते. साकेत येथिल विद्युत पुरवठा बंद झाल्यास अथवा काही अन्य कारणाने साकेत येथून पंपिंग करणे अशक्य झाल्यास एम.आय.डी.सी च्या पाईपलाईन वरील प्रेशर वाढून एम.आय.डी.सीची पाईपलाईन फुटणे/नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत कापूरबावडी येथून जास्त प्रमाणात पंपिंग करुन एम.आय.डी.सी च्या पाईपलाईन वरील प्रेशर कमी करणे शक्य होऊ शकते. परिणामी एम.आय.डी.सी कडून प्राप्त झालेले पाणी अव्याहतपणे पंपिंग करुन मिरा-भाईंदर शहरास पुरवठा करणे शक्य होऊ शकेल.

कापूरबावडी येथिल पंपिंग मशिनरी ११ वर्षापूर्वी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यांची क्षमता सद्यस्थितीतील पाणी पुरवठा करण्यास तसेच उपरोक्त प्रमाणे परिस्थितीत उद्भवल्यास पुरेशी नाही. याकरीता पंपांची क्षमता वाढवणे, तद्‌नुशंगिक विद्युत उपकरणे नविन बसविणे, तसेच प्रेशर व पाण्याच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे या करीता अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनीक उपकरणे बसविणे इ. कामे करणे आवश्यक आहे.

उपरोक्त संपूर्ण परिस्थिती विचारात घेऊन कापूरबावडी येथिल बुस्टर पंपिंग स्टेशन मधून विद्युत/यांत्रिकी उपकरणे तसेच पाईपलाईन इ. पाणी पुरवठयाच्या वाढीव क्षमतेकरीता नुतनीकरण करुन अद्यावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण करणे आवश्यक आहे.

या कामाकरीता रु. ३,७४,५०,३१६/- रक्कमेचे अंदाज पत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये **'पाण्याची टाकी/मिटर कार्यशाळा/इतर बांधकाम'** या लेखाशिर्षाखाली मंजूर आर्थिक तरतूदी मधून करण्याचे प्रस्तावीत आहे.

तरी सदर कामास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका 5/8/19

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०८ /०८/2019

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (४७) - **मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 178(ड)ई, 105(2ब), 297 या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत. सदरच्या कालावधीत मिरा भाईंदर महानगरपालिका ही नियोजन प्राधिकरण होते.

तद्नंतर महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीपी/4304/सीआर-246/04/नवि-11, दि.24/08/2004 अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या गावांसाठी शासनाने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांची नेमणूक केलेली होती.

महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या अधिसूचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन, नगरविकास अधिसूचना क्र. टिपीबी/4307/108/सीआर-29/07/युडी-11, दि.09/04/2007 अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ म. यांची नेमणूक झालेली होती.

तद्नंतर दि.01/12/2007 पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उक्त अधिसुचित क्षेत्रासाठी तयार केलेल्या विकास आराखडयास शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक सिएमएस/टिपीबी-4312/प्र.क्र.23/2013/नवि-11, दि.13/05/2013 व दि.03/06/2016 अन्वये मंजूरी प्राप्त आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या क्षेत्रासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका ही नियोजन प्राधिकरण आहे.

मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 178(ड)ई, 105(2ब), 297 या जागेपैकी स.क्र. 43क (जुना), 49/1 (नविन) या जागेसाठी यु.एल.सी. विभागामार्फत क्र. यु.एल.सी./टिए /टे-6/डोंगरी/एसआर-53, दि.08/03/2007 अन्वयेचे आदेश प्राप्त झालेनंतर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/2866/2007-08, दि.26/11/2007 अन्वये रहिवास व रेस्टॉरेन्ट या प्रयोजनार्थ प्राथमिक परवानगी दिलेली आहे.

तद्नंतर मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत क्र. महसूल/क-1/टे-1/एनएपी/एसआर-261/2007, दि.28/12/2007 अन्वये अकृषिक परवानगीचे आदेश प्राप्त झाले आहे.

अकृषिक आदेश प्राप्त झालेनतंर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/3942/2007-08, दि.02/02/2008 अन्वये इमारत प्रकार ए व बंगला (स्टिल्ट + 1) मजल्याकरिता 0.2 चटईक्षेत्र निर्देशांकानुसार 678.55 चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम परवानगी दिलेली आहे.

तद्नंतर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/657/2011-12, दि.27/05/2011 अन्वये हॉटेल व्यवसाय या प्रयोजनार्थ भोगवटा दाखला दिलेला आहे.

सद्यस्थितीत जागेवर शुभारंभ रिसॉर्ट प्रा.लि. या नावाने हॉटेल व्यवसाय सुरु आहे.

विद्यमान हॉटेलची जागा सन 1997 च्या मंजूर विकास योजनेनुसार Hill Zone मध्ये सामाविष्ट असून 0.2 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेनुसार मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 297 या जागा Green Zone मध्ये सामाविष्ट आहेत. तसेच स.क्र. 105(2ब) व 178(ड) ही जागा D-1 Zone मध्ये सामाविष्ट आहे.

मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 297 या जागा Green Zone मध्ये असल्याने 0.2 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तसेच स.क्र. 105(2ब) व 178(ड) या जागा D-1 Zone मध्ये सामाविष्ट असल्याने 0.3 मुळ चटईक्षेत्र + प्रिमीयमचे 0.2 चटईक्षेत्र असे एकूण 0.5 चटईक्षेत्र अनुज्ञेय आहे.

वरील चारही सर्व्हे क्रमांकामधील जागा मे. शुभारंभ रिसॉर्ट प्रा.लि. यांचे मालकीच्या असल्याने त्यांनी दि.10/01/2018 रोजीच्या पत्रान्वये शासनास सदरील सर्व जागा D-2 Zone मध्ये सामाविष्ट करणेची मागणी केलेली आहे.

D-2 झोन मध्ये 1.0 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तरी शासनाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सदर जमिनीचा Development Zone-2 या वापर विभागात सामाविष्ट करणेसाठी मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करून निर्णय होणेसाठी सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दिनांक ... वेळ ...
प्र. सभा शाखा / प्र. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर क्र. ... वर्ष ...
निरीक्षक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०८/2019

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (४८) - **मौजे घोडबंदर, स.क्र. 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 79/1,3,4, 75/1 या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे बांधकामाबाबत.**

मिरा भाईंदर शहरासाठी विकास योजना मंजूर होणेपुर्वी विषयांकित जागेसाठी जा.क्र. नपा/नर/2805/7885/94-95, दि.02/01/1995 अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला देण्यात आलेला असून त्यानंतर सदर जागेसाठीचे मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील जा.क्र. महसूल/कक्ष-1/टे-7/एनएपी/एसआर-1/95, दि.15/04/1995 अन्वयेच्या अकृषिक परवानगीच्या आदेशासह बांधकाम परवानगी मिळणेस विनंती केल्याप्रमाणे जा.क्र. मनपा/नर/349/6217/95-96, दि.25/09/1995 अन्वये बांधकाम परवानगी व जा.क्र. नपा/नर/124/1143/96-97, दि.24/05/1996 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीप्रमाणे विकासकांनी जागेवर बांधकाम सुरु करुन सदर जागेच्या मंजूर रेखांकनामधील सदनिका / गाळे / ऑफिसेस यांची विक्री केलेली आहे.

त्यानंतर मिरा भाईदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14 मे 1997 अन्वय मंजूर करण्यात आलेली असून, दि.15 जुलै 1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25 ऑगस्ट 2000 अन्वये मंजूर झालेली असून, दि.15 ऑक्टोबर 2000 पासून अंमलात आलेली आहे.

सदर मंजूर विकास योजनेप्रमाणे विषयांकित जागेच्या मंजूर रेखांकनातील "गौरव एन्क्लेव्ह" या गृहप्रकल्पाच्या स.क्र. 75/1 या जागेमधील (तळ + 1) स्वरुपाचे शॉपिंग सेंटर हे आ.क्र. 305 (बगीचा) या आरक्षणाने बाधीत होत आहे.

सदरचे शॉपिंग सेंटर सद्यस्थितीत आ.क्र. 305 (बगीचा) या आरक्षणामध्ये येत असून जागेवर मालकांनी सदर शॉपिंग सेंटरला किरकोळ दुरुस्तीसह प्लास्टर करुन त्यामध्ये हॉटेल सुरु करणेसह या इमारतीस भोगवटा दाखला मिळणेस संदर्भिय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

सबब सदर शॉपिंग सेंटरची (तळ + 1) स्वरुपाची इमारत सद्यस्थितीत आ.क्र. 305 (बगीचा) या आरक्षणाने बाधीत होत असल्यामुळे सदर इमारतीसाठी भोगवटा दाखलासह किरकोळ दुरुस्ती व त्या इमारतीमध्ये हॉटेलचा व्यवसाय सुरु करणेस परवानगी द्यावी किंवा कसे ? याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मिळणेकरिता पत्र क्र. मिभा/मनपा/नर/434/2019-20, दि.25/04/2019 अन्वये पाठविले असता, मा. शासनाने पत्र क्र. टिपीएस-1219/1564/19/नवि-12, दि.23/07/2019 अन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि.14/05/1997 रोजी व वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली आहे. तसेच सदर विकास योजना सन 1992 मध्ये प्रसिध्द झालेली आहे. मिरा भाईंदर शहराची विकास योजना सन 1992 मध्ये प्रसिध्द झाल्यानंतर त्यामधील प्रस्तावित आ.क्र. 305 (बगीचा) ने बाधीत जागेवर मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकासकास परवानगी दिल्याचे दिसून येते. सबब सदर परवानगी नियमानुसार नसून मंजूर विकास योजनेनुसार बांधकामा खालील जागा आ.क्र. 305 (बगीचा) ने बाधीत होत असल्याने सदर आरक्षणात फेरबदल झाल्याशिवाय प्रस्तावित वापर अनुज्ञेय होणार नाही.

वरीलप्रमाणे शासनाच्या अभिप्रायानुसार मौजे घोडबंदर, स.क्र. 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 75/1, 79/1,3,4 या जागेमधील, आ.क्र. 305 (बगीचा) ने बाधीत विद्यमान (वाणिज्य वापराच्या) बांधकामाबाबत महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी मा. महासभेपुढे विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि 04/08/2019 वेळ 09.20
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर क्र. ४४ वर्ष :- 2019-20

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.09/08/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (49)** - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तातंरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणा प्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षित आ.क्र. 328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) चे मंजूर विकास योजना अहवालानुसार एकूण क्षेत्र 10000 चौ.मी. असून प्रत्यक्षात जागेवर उपलब्ध होणारे क्षेत्र 9766.91 चौ.मी. आहे. त्यापैकी विकास हक्क प्रमाणपत्र व मंजूर नकाशानुसार महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र 1361 चौ.मी. उर्वरीत क्षेत्रापैकी 7526.20 चौ.मी. क्षेत्राची मालकी सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांचेकडे आहे. सदरचे आ.क्र. 328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) विकसीत करण्याचे सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांचा मानस असल्याचे दिसून येते. यास्तव सदर आरक्षणाने बाधीत महानगरपालिकेच्या मालकीची / ताब्यातील जमिन मिळणेकामी संदर्भिय पत्रान्वये सदर संस्थेने मा. महासभा दि.05/09/2018 (दि.04/09/2018 रोजीची तरकुब सभा) प्रकरण क्र. 63, ठराव क्र. 64 नुसार अ.क्र. 3 च्या अनुषंगाने 1361 चौ.मी. क्षेत्रासाठी बाजार भाव प्रति चौ.मी. 27320 चौ.मी. प्रमाणे रु.3,71,82,520/- रक्कम होत असून 10% रक्कम रु.37,18,252/- एवढे होत आहे. सदर प्रकरणात सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांनी 10% रक्कम म्हणून रु.39,54,845/- चेक क्र.925865 दिला आहे.

या कार्यालयामार्फत महानगरपालिकेस हस्तांतरित झालेल्या आरक्षणाने बाधीत क्षेत्रासाठी महानगरपालिकेसोबतचे नोंदणीकृत करारनामे, महानगरपालिकेचे नावे अभिलेखी नोंद झालेल्या 7/12 उतारा व ताबा पावतीसह सदर जमिनीचा ताबा मिळकत विभागाकडे दिलेला आहे. सदरचा विषय दि.09/08/2019 रोजीच्या महासभेत प्रकरण क्र. 49 अन्वये घेण्यात आलेला आहे. तरी शासन धोरणानुसार मनपाच्या ताब्यातील 1361 चौरसमीटर क्षेत्र सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांना देणेबाबत निर्णय होणेसाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2019-20/MG-4

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०८/08/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (५०)** - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आ.क्र. 252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करून घेऊन मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेल्या विकास योजनेतील आरक्षणाच्या जागा विकासक/ जागामालक यांना महाराष्ट्र शासनाच्या सिध्दशिघ्र गणकाप्रमाणेच्या जागेसाठीच्या दराच्या 110% प्रमाणेची रक्कम भरणा करून घेऊन परत देणेबाबत मा. महासभेने दि. 05/09/2018 ( दि.04/08/2018 रोजीची तहकूब सभा) प्रकरण क्र. 63 ठराव क्र. 64 अन्वये मान्यता दिलेली असून त्याबाबत महानगरपालिकेने धोरण ठरविलेले आहे.

सदर धोरणाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथिल आ.क्र.252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" या आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्र स्वत:च्या मालकीचे असल्याचे नमूद करून महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र महानगरपालिकेच्या धोरणाप्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करून घेऊन विकासासाठी मिळणेबाबत मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांनी दि.18/06/2019 रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे नवघर येथिल आ.क्र.252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" या प्रायोजनासाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र 5000 चौ.मी. आहे. सदर आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी 2149.46 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या मालकीचे असून महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सिध्दशिघ्र गणकाप्रमाणे सदर जागेचा दर प्रती चौ.मी. 25640/- आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या धोरणाप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेची किंमत 2149.46 X 25640 X 110% = रु.6,06,23,370/- होत असून महानगरपालिकेच्या धोरणाप्रमाणे जागा मागणी करतांना भरावयाच्या 10% प्रमाणेची रक्कम रु.60,62,337/- होत आहे. सदर रक्कमेसाठी अर्जदार मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांनी कॉर्पोरेशन बँकेचा चेक क्र. 294526 सादर केलेला आहे.

सबब सदर प्रकरणी महानगरपालिकेने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे मौजे नवघर येथिल आ.क्र.252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" या आरक्षणा पैकी महानगरपालिकेच्या मालकीचे क्षेत्र 2149.46 चौ.मी. मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांना देणेसह आरक्षणाच्या एकत्रित विकास करणेस देणेबाबत निर्णय होणेस मा. महासभेपुढे सादर.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2019-20/MG-3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय
दि. 06/08/2019

**मा. महासभा दि. 09/08/2019**

**पुरक घोषणा**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीम. ------------------------------------------
नगरसेवक/नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची प्रकरण 2 नियम 1 (ज) अन्वये दिनांक 09/08/2019 रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र. क्र. | विषय |
|---|---|
| 53 | सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दिनांक 03/08/2019 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------<br>मिरा भाईंदर म.न.पा. क्षेत्रातील शौचालय देखभाल, दुरुस्तीचे संचलनाचे कामे वाल्मिक व मेहतर समाजाच्या संस्थांना देण्यांबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव/ पु-धो/ ९/१ दि. ०३/०८/२०१९


# सौ. स्नेहा शैलेश पांडे
(बी. कॉम., बी. एड.)
**नगरसेविका**
सदस्य -शिक्षण, समाजकल्याण, कला-क्रिडा समिती
मिरा भाईन्दर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईन्दर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईन्दर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : शॉप नं. ३, सोनम बसेरा, बिलडींग नं. १, न्यु गोल्डन नेस्ट फेस - ९, भाईन्दर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.
मोबाईल : 9323323894 / 7506133180 / 7777065522


जावक क्र. प्रकरण क्र. ५३ करिता दिनांक : 03/08/2019

प्रति,
१) मा. महापौर सो.
मिरा-भाईंदर महानगर पालिका,
२) मा. आयुक्त सो.,
मिरा-भाईंदर महानगर पालिका,
३) मा. नगरसचिव सो.,
मिरा-भाईंदर महानगर पालिका,

**विषय:- मिरा-भाईदर म.न.पा. क्षेत्रातील शौचालय देखभाल, दुरुस्तीचे संचलनाचे कामे वाल्मिक व मेहतर समाजाच्या संस्थाना देण्यांबाबत...**

**संदर्भ -: १. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचे शासन मरासकआ/ पत्र क्रं.२१५/०७-०८ दि. १०/०७/०७ चे पत्र.**

**२. महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण कलम (१) 'ज' अन्वये**

**३. मिरा-भाईंदर महानगर पालिका सार्वजनिक बांधकाम विभाग निविदा सुचना क्रं. ८१/ दि. ९/७/२०१९**

मा.महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भानवये मिरा-भाईंदर महानगर पालिका सार्वजनिक बांधकाम विभाग निविदा सुचना क्रं. ८१/दि. ९/७/२०१९ हे महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचे शासन मरासकआ/ पत्र क्रं. २१५/०७-०८ दि. १०/०७/०७ च्या पत्राचे उल्लंघन करत आहे. वाल्मिकी व मेहतर समाजाच्या उपजिविकेच्या साधनापासून हिरावून घेण्याचा व अन्याय करण्यांचा प्रयत्न मिरा-भाईंदर म.न.पा. प्रशासन करत आहे. तरी सामाजिक न्यायानुसार सदर विषय माहे ऑगस्ट २०१९ मा. महासभेत धोरणात्मक निर्णय घेण्यांसाठी येणे अत्यावश्यक आहे.

कळावे,

हि नम्र विनंती,

आपली नम्र,

सौ. स्नेहा शैलेश पांडे

विषय — शौचालये बांधणे, शौचालयाची स्वच्छता, देखभाल व दुरूस्ती, गटार बांधकाम व तसेच स्वच्छता साहित्य (सॅनिटरी) [illegible] कामांचे कंत्राट स्थानिक मुक्त मैलावाहक (बाल्मीकी/मेहतर सफाई कर्मचारी) कुटुंबिया[illegible] सहकारी संस्था/सॅनिटरी मार्ट केंद्रास प्रथम प्राधान्याने कामे देण्याची अंमलबजावणी बाबत

## महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग,
नविशासकिय इमारत, बि.विंग, ३रा मजला, चेंबुर (पुर्व) मुंबई
शासन मरासकआ/पत्र क्र.२१५/०७.०८
दिनांक १० जुलै २००७

संदर्भ:— १) महाराष्ट्र शासन राजपत्र— मेहतरांची नियुक्ती व टोपल्यांचे [illegible] (प्रतिबंध) अधिनियम, १९९३ कलम ४६, पोटकलम ३(अ) [illegible] (१) चा भाग ३ अन्वये.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र मरासकआ— डिसेंबर १९९७/(भाग—४) [illegible] (ब) (ड) (२) अन्वये.

३) महाराष्ट्र शासन— नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण [illegible] प्र.क्र.१६१/०३/नवि—२७, मंत्रालय, मुंबई—३२ दि.[illegible]

४) महाराष्ट्र शासन पाणी व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र [illegible] प्र.क्र.६५/शा.नि.क्र.पा.पु/ २१ दि.१२ सप्टें.२००१

प्रस्तावना:— ग्रामिण व नागरी भागात अस्तित्वात असलेल्या टोपल्यांच्या शौचालयांचे जलद्यौत शौचालयांत रूपांतर करणे, जलद्यौत (सुलभ) शौचालयांचे [illegible] ( स्वच्छता, देखभाल, दुरूस्ती ) मैला वाहण्याच्या कामातील मेहतरांची मुक्तता [illegible] मुक्त करयांत आलेल्या मेहतरांचे (सफाई कर्मचा—यांचे ) इतर लाभदायी व्यवसाय [illegible] पुनर्वसन करणे यासाठी महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र.१ नुसार अधिनियम व तरतुदी [illegible] केल्या आहे.

सफाई कर्मचारी हा प्रामुख्याने स्वच्छतेच्या कामाशी परंपरागत निगडीत [illegible] यांच्या पुर्वजा पासून यांनी आपल्या शहर/गावाची घाण, मैला साफ सफाई केला [illegible] करीत आहे. मात्र शासना कडील या समाजाच्या पुनर्वसन धोरणानुसार परंपरागत डोक्यावरून मैला वहण्याची पध्दत बंद करून जलद्यौत (सुलभ) शौचालयांचे [illegible] आहे वाल्मीक—मेहतर व तत्सम कुटुंबियातील व्यक्ती यामुळे बेरोजगार झालेल्या [illegible] यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे शासनाची मुख्य जबाबदारी आहे [illegible]

निर्देश:— शासन आदेश संदर्भ क्र.३अन्वये शौचालये बांधणे, शौचालयाची ... देखभाल व दुरूस्ती/गटार बांधकाम व दुरूस्ती तसेच शौचालय बांधकामाशी ... स्वच्छता विषयक सर्व साहित्य खरेदी आदि कामाचे कंत्राट बाल्मीकी, मेहतर ... सफाई कर्मचारी कुटुंबियांच्या शासन नोंदणीकृत सहकारी संस्था, सॅनिटरी मार्ट ... प्राधान्याने देण्यात यावे. यात कसूर झाल्यास संबंधित अधिकारी शासनास ... राहतील.

(सुरेश दलोड)
उपाध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई—३२
मा.प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई—३२
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई—३२.
मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई— ४०० ०३२
मा.प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई— ४०० ०३२
मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
मा.प्रधान सचिव, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई—३२
मा.राज्यपालांचे, सचिव, राजभवन, मंत्रालय, मुंबई— ४०० ०३२.
मा.महालेखापाल—१, मुंबई ( लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) मुंबई
मा.प्रधान सचिव, गृहविभाग (परिवहन), मंत्रालय, मुंबई—३२
मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई— ४०० ०३२.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई— ४०० ०३२.
मा.प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार) मंत्रालय, मुंबई—३२
मा.प्रधान सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
मा.महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई—
मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई
मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको भवन, नवीमुंबई
मा.व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई
मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण पारेषण कंपनी, मुंबई
मा.महानगर आयुक्त, एम.एम.आर.डी.ए. महाराष्ट्र राज्य, बांद्रा, मुंबई
मा.व्यवस्थापकीय संचालक, म्हाडा, महाराष्ट्र राज्य, बांद्रा मुंबई
मा.महाव्यवस्थापक, बेस्ट भवन, महाराष्ट्र राज्य, कुलाबा मुंबई.
मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई—२१
मा.व्यवस्थापकीय संचालक, हुडको महाराष्ट्र राज्य, बांद्रा मुंबई.
सर्व मा.विभागीय आयुक्त,
सर्व मा.आयुक्त, महानगरपालिका
सर्व मा.जिल्हाधिकारी
सर्व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
मा.प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व मा.कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड
सर्व मा.मुख्याधिकारी नगरपालिका, नगरपंचायत
सर्व मा.सभापती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती.